# मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म.**/ /
दि.२६/०५/२०२६

## *मा.आयुक्त महोदयांनी केली नालेसफाई कामाची पाहणी*

मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) महोदयांनी दि.२६ मे २०२६ रोजी शहरातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून नालेसफाईच्या कामांचा आढावा घेतला. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणी साचू नये तसेच नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी महानगरपालिकेमार्फत नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.
मा.आयुक्त महोदयांनी सर्वप्रथम आचोळे येथील कॅपिटल मॉलजवळ रेल्वे लगतच्या असलेल्या नाल्याच्या सफाईच्या कामाची पाहणी केली, यानंतर वसई पश्चिमेकडील डी जी नगर उद्यान दिवाणमान परिसरातील सुरु असलेल्या चेंबरच्या सफाईच्या कामाची पाहणी केली तसेच वसई पश्चिमेकडील बाभोळा येथील दत्तानी मॉलच्या समोर असलेल्या नाल्याच्या सफाईच्या कामाची पाहणी करण्यात आली. त्याचप्रमाणे वसई किल्ला येथील खाडीस मिळणाऱ्या नाल्याचीही पाहणी करण्यात आली. यावेळी मा.आयुक्त महोदयांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांना नालेसफाईची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच गाळ उपसून तो तात्काळ उचलण्यात यावा, नाल्यांमधील अडथळे दूर करण्यात यावेत आणि साफसफाईच्या कामात कोणतीही हलगर्जी होऊ नये, असे निर्देशही त्यांनी दिले. काही ठिकाणी आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना देत नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले.
या पाहणीवेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.उप-आयुक्त श्रीम.अर्चना दिवे, सहाय्यक आयुक्त श्री.जितेंद्र नाईक, संबंधित विभागाचे स्वच्छता निरीक्षक, अभियंते व इतर कर्मचारी उपस्थित होते.
महानगरपालिकेमार्फत पावसाळापूर्व तयारी अंतर्गत नालेसफाई, रस्ते दुरुस्ती, जलनिस्सारण व्यवस्था सुधारणा तसेच आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याची कामे वेगाने सुरू असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. नागरिकांनी देखील नाल्यांमध्ये कचरा, प्लास्टिक अथवा बांधकाम साहित्य टाकू नये, असे आवाहन यावेळी करण्यात आले. शहर स्वच्छ व पूरमुक्त ठेवण्यासाठी महानगरपालिका प्रशासनास नागरिकांनी सहकार्य करावे, असेही मा. आयुक्त महोदयांनी सांगितले.